# जाहीर निविदा

याद्वारे आपणास कळविण्यात येते की, दिवाणी न्यायालय क. स्तर शेवगांव या न्यायालयाचे आवारात फक्त न्यायालयीन कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढण्यासाठी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून व मा. उच्च न्यायालयाच्या करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नवीन झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडरचे कामासाठी अपंग व्यक्तीची किंवा इच्छुक व्यक्तींची झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हाइडर म्हणुन नेमणुक करावयाची असून त्यासाठी स्वत:ची झेरॉक्स मशीन असणे आवश्यक असून झेरॉक्स कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

तरी वरील कामासाठी इच्छुक व्यक्तींनी किंवा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन नं. ७४३/२०१३ अन्वये अपंग व्यक्तींना झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणून प्राधान्य देण्याचे असल्याने अपंग व्यक्तींनी आपले अर्ज दिनांक २५/०६/२०२४ अखेर सायंकाळी ६.०० पर्यंत खालील सही करणार यांचे नावाने या न्यायालयात सादर करावेत. तसेच अपंग व्यक्तींना प्राध्यान्य दिले जाणार असल्यामुळे अर्जासोबत अपंग प्रमाणपत्राची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

तसेच मा. महोदयांच्या तोंडी आदेशान्वये झेरॉक्स सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणून नियुक्त करण्यात येणा-या व्यक्ती / फर्मकरीता झेरॉक्स ऑउटसोर्सिंगच्या कामासाठी ए-४ कागदाकरीता रुपये १-२५ पैसे, लिगल कागदाकरीता रुपये १-५० पैसे व ए - ३ कागदाकरीता रुपये २-०० अशी रक्कम आकारण्यासाठी मंजुरी देणेबाबत विचाराधिन आहे. दिनांक २५/०६/२०२४ सायंकाळी ६.०० नंतर येणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ११ जुन २०२४ रोजी माझे सही शिक्यानिशी नोटीस प्रसिध्द केली असे.

(एस.यु. जागुष्टे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शेवगाव,
जिल्हा अहमदनगर.

ठिकाण: शेवगाव
दिनांक ११.०६.२०२४

**प्रत -**

१. न्यायालयाचे नोटीस बोर्ड.
२. तहसील कार्यालय , शेवगाव.
३. पंचायत समीती, शेवगाव
४. शेवगाव नगरपरिषद, शेवगाव.
५. स्थानिक पातळीवरील शैक्षणिक संस्था / सेवाभावी संस्था / बँका
६. झेरॉक्स दुकाने असलेले ठिकाण.
७. न्यायालय ई - कोर्ट प्रणाली.